रजि.नं. : ई-६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

जा.नं. एसएसएस/भांडार/3068/२०२१
दि. 14 JAN 2021

प्रति,
-----------------------------------
-----------------------------------
-----------------------------------

**विषयः- सन २०२१-२२ करीता मध्यवर्ती भांडार विभागासाठी हमाली कामाचे दरपत्रकांबाबत...**

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता संस्थानचे मध्यवर्ती भांडार विभागामध्ये खरेदी करणेत येणारा किराणा माल, कडधान्ये, पुस्तके, इतर प्रकाशने साहित्य तसेच इलेक्ट्रीक व हार्डवेअर मटेरियल तसेच इतर साहित्य/ वस्तु गोडावूनमध्ये उतरवून थप्पी मारणे व इतर हमाली कामांसाठी दरपत्रके मागवीणेत येत आहेत. आपण खालील हमाली कामासाठी आपले हमालीचे दर सोबतचे पत्रात दिलेले नमुन्यामध्ये सादर करावेत.

**हमाली कामाचा तपशिल**

| अ.नं. | मालाचे नांव/ वजन | परिमाण | हमालीचे दर | |
|---|---|---|---|---|
| | | | रुपये. | पैसे. |
| ०१ | साखर, गहू, तांदुळ, हरभरा, तुरदाळ, मुगदाळ, हरभरा डाळ व इतर किराणा माल. (२५/३०/५० कि.ग्रॅ. वजनाची गोणी) | प्रती क्विंटल | | |
| ०२ | मिनरल वॉटर बॉक्स (१ लि./५०० मि.) | प्रती बॉक्स | | |
| ०३ | बिस्कीट, पेपर कप, चहा पावडर, कॉफी, खिसमिस इ.बॉक्स. | प्रती बॉक्स | | |
| ०४ | पेपर पिशवी. (२५ किलो वजनाची बॅग) | प्रती बॅग | | |
| ०५ | गाईचे शुध्द तुप, वनस्पती तुप, खाद्यतेल व काजु पाकळी यांचे डबे. (१०/१५ कि.ग्रॅम वजनाचा डबा) | प्रती डबा | | |
| ०६ | पत्रावळ ( बंडल) | प्रती बंडल | | |
| ०७ | ब्लिचींग पावडर (२५ किलो वजनाची गोणी) | प्रती गोणी | | |
| ०८ | लिंडेन बी.एच.सी. किंवा इतर पावडर. (५० किलो वजनाची गोणी) | प्रती गोणी | | |
| ०९ | तुरटी (सुटी असल्याने) | प्रती क्विंटल | | |
| १० | लोखंडी सामान. | प्रती टन. | | |
| ११ | पुस्तके/ फोटो, प्लॅस्टीक वस्तु व इतर. | प्रती क्विंटल | | |
| १२ | क्वॉयर फोम गाद्या, चादरी गाठ, बेडशिटस् गाठ, उश्या गाठ. | तळमजला. | | |
| | | पहिला मजला | | |
| | | २/३ मजला. | | |
| १३ | स्टेशनरी बॉक्स | प्रती बॉक्स | | |
| १४ | वाराई (संस्थानव्यतिरिक्त आलेल्या वाहनातुन) | प्रती टन | | |



मुंबई : साईनिकेतन, ८०४, ब, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४
दुरध्वनी : +९१-२२-२४१६६५५६ फॅक्स : +९१-२२-२४१५०७९८. टेलिग्राम - साईनिकेतन, मुंबई.
• Website : http://www.shrisaibabasansthan.org / www.sai.org.in • Email : saibaba@sai.org.in

**वरील हमाली कामासाठी अटी-शर्तीचा तपशिल खालीलप्रमाणे:-**

१. हमाली कामाचा कालावधी हा दि. ०१ एप्रिल २०२१ ते दि. ३१ मार्च २०२२ असा राहील.

२. कार्यादेश झालेनंतर हमाली काम करणेची हमी म्हणून अनामत रक्कम रु. ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) संस्थानचे लेखाशाखेत भरावी लागेल. सदरचे रकमेवर कोणतेही व्याज मिळणार नाही.

३. संस्थान वाहनातुन आलेल्या मालाला वाराई आकारता येणार नाही.

४. संस्थानचे गोडावून हे विखुरलेले असल्या कारणाने उपलब्ध असलेल्या गोदामामध्ये मंजूर दरामध्येच हमाली काम करुन द्यावे लागेल. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ मिळणार नाही. काही माल/ वस्तु पहिला, दुसरा मजला येथे वाहून नेवून थप्पी मारावयाच्या आहेत. सदर काम करणे बंधनकारक आहे, त्यासाठी कोणतीही सबब सांगून टाळाटाळ करता येणार नाही.

५. हमाली काम सुरु असतांना दुर्देवाने एखाद्या हमालाला अपघात झालेस त्याच्या अपघाताची सर्वस्वी जबाबदारी दरपत्रक धारकावर राहील, त्याबाबत संस्थानकडे कोणतीही नुकसान भरपाई मागता येणार नाही.

६. माल उतरविणेकामी शक्यतो कमीत-कमी १० (दहा) कामगार दररोज उपस्थित ठेवणे आवश्यक राहील.

७. सदर हमाली दर दि.३१/०३/२०२२ अखेर असून, काही कारणास्तव किंवा हमाली कामाची वार्षिक प्रक्रिया पुर्ण होवून पुढील आदेश होईपावेतो आपणास आहे त्याच दराने हमाली कामे करावी लागतील.

८. हमालीचे होणारे बील आपणास शक्यतो दररोज सायंकाळी आदा करण्यात येईल.

९. माल आल्यानंतर तो आपणास भांडार-अधिक्षक/ कर्मचारी यांचे सुचनेनुसार विना तक्रार खाली करुन द्यावा लागेल. सदरकामी आपणांस दिरंगाई/टाळाटाळ करता येणार नाही. कामांस वेळेचे बंधन नाही, ज्यावेळी माल येईल त्या वेळेस माल खाली करावा लागेल. अपवादात्मक परिस्थितीत माल इतरांकडून खाली करुन घ्यावा लागल्यास व त्याकामी जादा हमाली दयावी लागल्यास जादाची रक्कम आपल्या बिलातुन अथवा अनामत रकमेतुन वसुल करणेत येईल.

१०. दरपत्रक धारकास पॅन कार्डची झेरॉक्स प्रत संस्थानला द्यावी लागेल.

११. सरकारी नियमानुसार आपणास आयकर, जी.एस.टी. किंवा इतर कर भरणे बंधनकारक राहील. सदरची कर वसुलीची पात्र रक्कम आपल्या देय हमाली बिलातुन वसुल करणेत येईल.

१२. कोणतेही दरपत्रक/ अंशतः अथवा पुर्णपणे स्विकारणे किंवा नाकारणेचा अधिकार संस्थानने राखून ठेवला आहे.

१३. आपली कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक रहाणार नाही, त्यांचा विचार केला जाणार नाही.

१४. सदर व्यवहारात काही वाद निर्माण झाल्यास तो राहाता/ कोपरगांव न्यायालयाच्या न्यायकक्षेत राहील.

१५. उपरोक्त अटी व शर्तीत काही बदल अगर सुधारणा करणेचा वा जादा अटी/ शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थानने राखून ठेवलेला आहे.

१६. उपरोक्त अटी व शर्तीपैकी एक किंवा अनेक किंवा कोणत्याही अटी/ शर्तीचा भंग झाल्यास आपली बयाणा/ अनामत रक्कम जप्त करुन संस्थान जमा करणेत येईल, तसेच कामाचा आदेश रद्द केला जाईल, त्याबाबत आपली कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

वरील हमाली कामाचे स्वरुप प्रत्यक्षात बघून व वरील अटी/शर्ती वाचूनच दरपत्रक भरावे. आपले दरपत्रक सोबतचे नमुन्यात भरुन ते "मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी" यांचे नावाने "भांडार विभागाचे हमाली कामाचे दरपत्रक"असे पाकीटावर लिहून बंद पाकीटात सादर करावे. आपले दरपत्रक दि. 05/02/२०२१ पर्यंत संस्थानकडे सादर करणे आवश्यक आहे, उशिरा येणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

दि.     /     /२०२१

प्रति,

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

यांसी...

**विषय :- सन २०२१-२२ करीता संस्थानचे भांडार विभागासाठी हमाली कामाचे दरांबाबत...**

अर्जदाराचे नांव व पत्ताः- ------------------------------------------

------------------------------------------

------------------------------------------

महोदय,

**सन २०२१-२२** करीता संस्थानचे मध्यवर्ती भांडार विभागाचे किराणा माल, कडधान्ये, पुस्तके, इतर प्रकाशने साहित्य, इलेक्ट्रीक व हार्डवेअर मटेरियल तसेच इतर साहित्य/ वस्तु गोडावूनमध्ये उतरवून थप्पी मारणे व इतर हमालीचे कामकाज मी खालील नमुद दराने करणेस तयार असुन याबाबतच्या संस्थानच्या सर्व अटी/ शर्ती मी वाचल्या असुन त्या मला मान्य आहेत.

तरी सदर हमाली कामाचे टेंडर मला मिळावे, हि विनंती आहे.

**हमाली कामाचा तपशिल व दर**

| अ.नं. | मालाचे नांव/ वजन | परिमाण | हमालीचे दर | |
|---|---|---|---|---|
| | | | रुपये. | पैसे. |
| ०१ | साखर, गहू, तांदुळ, हरभरा, तुरदाळ, मुगदाळ, हरभरा डाळ व इतर किराणा माल. (२५/३०/५० कि.ग्रॅ. वजनाची गोणी) | प्रती क्विंटल | | |
| ०२ | मिनरल वॉटर बॉक्स (१ लि./५०० मि.) | प्रती बॉक्स | | |
| ०३ | बिस्कीट, पेपर कप, चहा पावडर, कॉफी, खिसमिस इ.बॉक्स. | प्रती बॉक्स | | |
| ०४ | पेपर पिशवी. (२५ किलो वजनाची बॅग) | प्रती बॅग | | |
| ०५ | गाईचे शुध्द तुप, वनस्पती तुप, खाद्यतेल व काजु पाकळी यांचे डबे. (१०/१५ कि.ग्रॅम वजनाचा डबा) | प्रती डबा | | |
| ०६ | पत्रावळ ( बंडल) | प्रती बंडल | | |
| ०७ | ब्लिचींग पावडर (२५ किलो वजनाची गोणी) | प्रती गोणी | | |
| ०८ | लिंडेन बी.एच.सी. किंवा इतर पावडर. (५० किलो वजनाची गोणी) | प्रती गोणी | | |
| ०९ | तुरटी (सुटी असल्याने) | प्रती क्विंटल | | |
| १० | लोखंडी सामान. | प्रती टन. | | |
| ११ | पुस्तके/ फोटो, प्लॅस्टीक वस्तु व इतर. | प्रती क्विंटल | | |
| १२ | क्वॉयर फोम गाद्या, चादरी गाठ, बेडशिटस् गाठ, उश्या गाठ. | तळमजला. | | |
| | | पहिला मजला | | |
| | | २/३ मजला. | | |
| १३ | स्टेशनरी बॉक्स | प्रती बॉक्स | | |
| १४ | वाराई (संस्थानव्यतिरिक्त आलेल्या वाहनातुन) | प्रती टन | | |

आपला विश्वासू,